# 2017-18

# BOOKS

**Dr.Panduranga Bhosale**

**Marathi**




Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya
Aundh, Pune-67.

Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya Aundh, Pune-67

ISBN : 978-81-934248-6-5

# मराठी ग्रामीण साहित्य

Marathi Gramin Sahitya

सर्व हक्क : संपा.: डॉ. हेमलता गायकवाड
डॉ. पांडुरंग भोसले

पत्ता : १, 'सारंग', यशवंतनगर, गेंडामाळ, शाहूपुरी, सातारा
भ्रमणध्वनी : ०२१६२/२५०४७४
९४२३२५५०३८

**प्रकाशक :**
**ज्योत्स्ना मोरेश्वर नेरकर**
शब्दवैभव प्रकाशन,
शॉप नं. २१५, महालक्ष्मी मेट्रो स्क्वेअर, जोगेश्वरी लेन ४,
बुधवार पेठ, पुणे - ४११००२
भ्रमणध्वनी : ७३५०८८४८६१/८८५५८९०३०७

**अक्षरजुळणी/मुद्रक :**
**मोरेश्वर संतोष नेरकर**
शब्दवैभव प्रकाशन, पुणे
**भ्रमणध्वनी :** ८८५५८९०३०६/०७

**मुखपृष्ठ** : तुषार निवंडीकर

**प्रथमावृत्ती** : ६ डिसेंबर २०१७

**मूल्य** : दोनशे रूपये मात्र

* सदर लेखातील मतांशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही.

*Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya* Aundh, Pune-67.

ISBN : 978-81-934248-6-5

# मराठी ग्रामीण साहित्य

Marathi Gramin Sahitya

**सर्व हक्क : संपा.: डॉ. हेमलता गायकवाड**
**डॉ. पांडुरंग भोसले**

पत्ता : १, 'सारंग', यशवंतनगर, गेंडामाळ, शाहूपुरी, सातारा
**भ्रमणध्वनी** : ०२१६२/२५०४७४
९४२३२५५०३८

**प्रकाशक :**
**ज्योत्स्ना मोरेश्वर नेरकर**
शब्दवैभव प्रकाशन,
शॉप नं. २१५, महालक्ष्मी मेट्रो स्क्वेअर, जोगेश्वरी लेन ४,
बुधवार पेठ, पुणे - ४११००२
भ्रमणध्वनी : ७३५०८८४८६१/८८५५८९०३०७

**अक्षरजुळणी/मुद्रक :**
**मोरेश्वर संतोष नेरकर**
शब्दवैभव प्रकाशन, पुणे
**भ्रमणध्वनी** : ८८५५८९०३०६/०७

**मुखपृष्ठ** : तुषार निवंडीकर

**प्रथमावृत्ती** : ६ डिसेंबर २०१७

**मूल्य** : दोनशे रूपये मात्र

* सदर लेखातील मतांशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही.

उत्पादनाला हमी भाव नाही, व्यापाऱ्यांकडून
ारांकडून नाडला जात आहे, तरूण जमिनी गहाण
येत आहेत. शिकल्यानंतर नोकरीसाठी गावोगाव
ारणाचा शिरकाव वाढला आहे, धनदांडगे साम,
ातील कुटुंबे उद्ध्वस्त करीत आहेत. वाढत्या
कडे होत आहेत. या आणि यासारख्या विविध
चालली आहेत. हे आणि यासारखे विविध प्रश्न
कऱ्यांना हतबल करीत आहेत. याचे चित्रण तर
हित्यिक त्यांना जीवनात सक्षमपणे उभे राहण्याचे
वर समीक्षेच्या अंगाने पुढे नेण्याची गरज सतत
साहित्य' या ग्रंथ संपादनाच्या निमित्ताने वर नमूद
समोर याव्यात हा प्रांजळ हेतू आहे. या ग्रंथाच्या
संशोधकांनी आपले लेख वेळेत पाठवून सहकार्य
धन्यवाद !
ाणि वेळेत पूर्ण करणारे शब्दवैभव प्रकाशनाचे
व त्यांचे सहकारी यांचे मनापासून आभार मानून
कांसमोर नम्रपणे ठेवत आहोत.

**संपादक**
**डॉ. पांडुरंग भोसले**
**डॉ. हेमलता गायकवाड**

Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya Aundh, Pune-67.

# अणुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १. | ग्रामीण साहित्य : संकल्पना, स्वरुप व वाटचाल<br>-डॉ. पांडुरंग भोसले | ७ - १५ |
| २. | रानातल्या कवितांचा प्रतिध्वनी<br>-डॉ. हेमलता गायकवाड | १६-२८ |
| ३. | ग्रामीण साहित्य चळवळीची वाटचाल<br>-प्राचार्य डॉ.शोभा इंगवले | २९-४२ |
| ४. | 'काया मातीत मातीत' मधील ग्रामीण वास्तव : एक शोध<br>-डॉ. राजेंद्र खंदारे | ४३-४७ |
| ५. | ग्रामीण साहित्य चळवळ आजची स्थिती<br>- डॉ. सुहासकुमार बोबडे | ४८-५८ |
| ६. | १९७५ नंतरच्या ग्रामीण साहित्याची वाटचाल<br>- डॉ. निशा भंडारे | ५९-६२ |
| ७. | १९९० नंतरची ग्रामीण कथा : स्वरूप आणि वैशिष्ट्ये<br>- प्रा. सुनिता सूर्यवंशी | ६३-६९ |
| ८. | ग्रामीण जीवनाचे वास्तव चित्रण-बारोमास<br>- प्रा. मोरेश्वर नेरकर | ७०-७३ |
| ९. | १९९० नंतरचे मुस्लीम ग्रामीण साहित्य<br>- डॉ. केतकी भोसले | ७४-७९ |
| १०. | 'काळेशार पाणी' मधील ग्रामजीवन<br>- डॉ.पौर्णिमा कोल्हे | ८०-८५ |
| ११. | मराठी ग्रामीण कविता : स्वरुप आणि मर्यादा<br>- प्रा. कैलास सलादे | ८६-९६ |

Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya * Aundh, Pune-67 *

# ग्रामीण साहित्य : संकल्पना, स्वरुप व वाटचाल

डॉ. पांडुरंग भोसले, पुणे

स्वातंत्र्योत्तर कालखंडात सर्वच पातळ्यावर उलथापालथी झाल्या. साहित्य हेही त्याला अपवाद राहिले नाही. साहित्यातही ग्रामीण साहित्य, दलित साहित्य, प्रादेशिक साहित्य, जनवादी साहित्य, स्त्रीवादी साहित्य, बालसाहित्य, आदिवासी साहित्य, ख्रिस्ती साहित्य, मुस्लिम साहित्य, कामगार साहित्य, महानगरीय साहित्य असे विविध प्रवाह आणि साहित्यिक चळवळी उभ्या राहिल्या या सर्वांमधील एक प्रवाह ग्रामीण साहित्याचा. त्या साहित्याची संकल्पना, स्वरुप, पूर्वपीठिका व वाटचाल समजून घेणे येथे अभिप्रेत आहे.

सर्वप्रथम ग्रामीणता, खेडे, तेथील जीवनरहाटी समजून घ्यायला हवी. खेड्यात सुमारे साठ ते सत्तर टक्के लोक राहतात. तेथे कृषिसंस्कृतीला खूपच महत्त्व असते किंबहुना खेड्यातील जीवनच कृषिकेंद्रींत असते. या खेड्यात स्तरनिहाय विविध गट असतात. हे गट निर्माण होण्यापाठीमागे सर्वसामान्यपणे पुढील कारणे असतात. ''१. रक्तसंबंध, वंशसंबंध किंवा सामाईक पूर्वज यात लोकांच्या समजुतीला महत्त्व असते, खरेखोटेपणाला नाही. २. विवाहसंबंध, ३. समाज धर्म, श्रदधा, कर्मकांड इत्यादी. ४. भाषा, बोली आणि लोकनीतील साधर्म्य. ५. जमिनीची सामाईक मालकी आणि तिचा वापर. ६. प्रादेशिक सामीप्य किंवा ऐकमेकांच्या शेजारी राहणे. ७. सामाजिक हक्क–कर्तव्यांच्या व शासकीय व्यवस्थेच्या बाबतीतील समाईक जबाबदारी. ८. व्यावसायिक हितसंबंध. ९. अनेक प्रकारचे आर्थिक हितसंबंध. १०. समाईक सत्तेखाली वावरणे. ११. एकाच धार्मिक, शासकीय, शैक्षणिक किंवा इतर सामाजिक संस्थांशी संलग्न असणे. १२. समाईक सरंक्षणाची यंत्रणा. १३. समाजजीवनातील परस्पर सहाय्याचे सातत्य. १४. जीवनाची सर्वसामान्य पद्धत, अनुभव आणि सामाजिक व्यवहार हे समान, समाईक किंवा एकत्रित असणे.''[१]

वरील कारणांनी गट निर्माण होत असले तरी रक्ताची नाती, विवाह, भाषा धर्म आणि जमिनीची मालकी यांच्यामुळे निर्माण झालेले गट अधिक

प्रभावी व घनिष्ठ असल्याचे प्रत्ययास येते. याबरोबरच बारा बलुतेदार, अठरा अलुतेदार हे या ग्रामजीवनाचे महत्त्वाचे घटक ठरतात. त्रिं.ना.अत्रे यांनी कारु आणि नारु अशी त्याची विभागणी केलेली आहे. ग्रामसंस्कृती ही प्रारंभापासून कृषिकेंद्रीत आहे. बदलत्या कालप्रवाहाबरोबर काही परिवर्तने होत असली तरी 'कृषिकेंद्रीत रचना' हे ग्रामसंस्कृतीचे मुख्य वैशिष्ट्य राहिल असे डॉ.नागनाथ कोत्तापल्ले यांना वाटते आणि ते मान्य होण्यासारखे आहे. कारण शेती आणि शेतकऱ्याला मध्यवर्ती मानूनच गावगाडा निर्माण झालेला आहे. त्रिं.ना.अत्रे यांनी खेड्याचे मनोज्ञ असे चित्रण केले आहे. ते लिहितात,''खेडे म्हटले की,अगोदर चटकन काळीच डोळ्यापुढे उभी राहते. शेते, पिके, गवत, झाडे, गुरेढोरे, शेळयामेंढ्या, मेंढके, शेतकरी, गुराखे, पाट, बुडक्या, विहिरी, नांगर, कुळव, मोट, मळा, गोफण वगैरे बळीराजाचे वैभव खेड्याचे नाव काढताच इतके मन व्यापून टाकते की, खेड्यात शेतीखेरीज दुसरा रोजगार चालत असेल किंवा शेतकऱ्याखेरीज दुसरे कोणी राहात असेल असे एकाएकी मनातही येत नाही. कुणबी पुढे झाल्याखेरीज एकाही खेड्याची वसाहत झाली नाही. त्याने धान्य पैदा करुन इतरांच्या खाण्याची तरतूद केली, तेव्हा इतर गोळा झाले.''[२] यातून खेड्याचे मन वेधून घेणारे चित्रण लक्ष वेधून घेते. एकूणच काय पाटील, कुलकर्णी, कारु, नारु, फिरस्ते आणि या सर्वांची कामे यातून ग्रामजीवनाची खेडयाची एक संरचना आकाराला येते.

या सर्वांच्या जीवनानुभवातून आचार-विचारातून धर्मकारण, राजकारण, समाजकारण, अर्थकारण, शिक्षण, नीतीविचार पुढे येतात. कधी चौकटीत राहून तर कधी या व्यवस्थेला धक्के देत निर्माण झालेले समाजजीवन, माणूस, त्याच्या भावना, विचार, विकार, विविध नाती, माणसांची माणुसकी, त्यांचे विधायक कार्य, कधी विघातक कृत्ये, स्वार्थ, त्यातून निर्माण होणारे प्रश्न, धर्मांधता, जातीयता, वर्ण आणि वर्ग व्यवस्थेतून निर्माण होणारे प्रश्न, नैसर्गिक आपत्ती आणि त्यातून निर्माण होणारे प्रश्न, स्त्रियांचे विविध प्रश्न, पुरुषप्रधान मानसिकता या आणि यासारख्या विविध प्रश्नांना वाचा फोडण्याचे काम कळत नकळत सर्वच साहित्यप्रवाहांमधून घडते. ग्रामीण साहित्यातूनही ते घडत आलेले आहे याचा प्रत्यय येतो.

वर नमूद केलेले ग्रामीण समाजजीवनाचे जाणिवपूर्वक समाजजीवनाचे



चित्रण करावयाचे म्हणून केलेले नसले तरी अशी चित्रणे मध्ययुगीन कालखंडातील विविध लेखकांच्या लेखनातून आलेली आहेत हे विसरता येत नाही. मराठीतील पहिला लिखित ग्रंथ म्हणून मुकुंदराज यांच्या 'विवेकसिंधु' या ग्रंथास ओळखले जाते. त्यासह संत ज्ञानेश्वर, संत नामदेव आणि त्यांचे समकालीन संत यांचे अभंग, ओव्या, नरेंद्रांच्या ओव्या, संत तुकारामांचे अभंग, संत एकनाथांची भारुडे, महानुभावीयांचे लीळाचरित्र, दृष्टान्तपाठ सारखे ग्रंथ, पंडिती साहित्यात आख्यान काव्यात आलेले तत्कालीन विविध संदर्भ, लावणी, पोवाडा तसेच तमाशातील 'गणा' च्या निमित्ताने ग्रामजीवनातील विविध संदर्भ आलेले आहेत. मध्ययुगीन कालखंडापूर्वीपासून लोकसाहित्यातून मौखिक परंपरेने चालत आलेली लोकगीते तसेच लोककथा याची साक्ष देतात.

एकूणच मध्ययुगीन मराठी वाङ्यातील ग्रामीण चित्रणासंदर्भात नागनाथ कोत्तापल्ले म्हणतात.''प्राचीन मराठी वाङ्मयात ग्रामीण जीवनदर्शनाची सलग आणि समृद्ध अशी परंपरा नाही. परंतु काही ठिकाणी ग्रामीण जीवन, ग्रामीण वास्तव प्रकट होत गेलेले आहे. म्हणजे वाङ्मयाच्या प्रवाहात काही ठिकाणी ग्रामीणत्व प्रकट झाले आहे.''[३] मात्र कमी अधिक प्रमाणात आलेले हे ग्रामीण संदर्भ पुढील काळात निर्माण झालेल्या ग्रामीण साहित्यप्रवाहाची नांदी समजण्यास हरकत नाही.

एकोणिसावे शतक हे भारताच्या आणि पर्यायाने महाराष्ट्राच्या इतिहासातील लक्षवेधी शतक ठरले. १८१८ पेशवाई बुडाली आणि व्यापारी म्हणून आलेले इंग्रज राज्यकर्ते बनले. इंग्रजांच्या आगमनामुळे सर्वच पातळ्यांवर उलथापालथी झाल्या इंग्रजांच्या आर्थिक व्यवस्थेमुळे इथे असलेली परंपरागत ग्रामीण अर्थव्यवस्था मोडून पडली येथील समाजव्यवस्थेत जातीय आणि वर्गीय स्तरातून निर्माण झालेले प्रश्न सामाजिक भान असलेल्या समाजधुरिणांच्या लेखनाचे विषय बनले. कुटुंबव्यवस्थेचा अविभाज्य घटक असलेल्या स्त्रीला मिळत असलेली पशुवत वागणूक महात्मा फुले यांच्यासारख्या समाजसुधारकांच्या विचार आणि कार्याचा भाग बनली.त्याबरोबरच येथील उच्चवर्गीय व्यवस्थेकडून शेतकऱ्यांचे होत असलेले शोषण आणि इंग्रजांच्या अर्थव्यवस्थेमुळे शेतकऱ्यांच्या जीवनावर होत असलेले परिणाम यांची जाणीव



Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya, Aundh, Pune-67.

करुन देण्याच्या उद्देशाने महात्मा फुले यांनी 'ब्राह्मणांचे कसब' आणि 'शेतकऱ्यांचा आसूड' हे ग्रंथ लिहिले.

शेतकऱ्यांच्या अधोगतीला येथील पुरोहितवर्ग शासन व्यवस्थेतील नोकरशाही जबाबदार असल्याचे त्यांनी सांगितले त्याबरोबरच त्यांचे अज्ञान आणि परंपराप्रियता हीही त्याला कारणीभूत असल्याचे प्रतिपादन अत्यंत परखडपणे 'शेतकऱ्यांचा आसूड' मध्ये केले. साहजिकच डॉ.आनंद यादव यांच्यासारख्या ग्रामीण साहित्याच्या अभ्यासकाने 'आधुनिक देशी मराठी साहित्याचे आद्य जनकत्व' महात्मा फुले यांना दिले आहे ते योग्यच आहे. महात्मा फुले यांच्या चळवळीतील एक महान व्यक्तिमत्त्व म्हणून कृष्णराव भालेकर यांचा आवर्जून उल्लेख करावा लागेल. त्यांनी सर्वसामान्य माणसांच्या प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी 'दीनबंधू' हे नियतकालिक काढले त्यातून त्यांनी बहुजन समाजाचे आणि शेतकऱ्यांचे प्रश्न मांडले. या जाणिवेतूनच त्यांनी 'बळीबा पाटील' ही कांदबरी १८७७ मध्ये लिहिली. ती प्रथम 'दीनमित्र' मध्ये एप्रिल ते जुलै १८८८ या कालावधीत क्रमश: प्रसिद्ध झाली. बळीबा पाटील या आदर्श व्यक्तिमत्त्वाला केंद्रवर्ती ठेवून समग्र गावगाडा उभा केला आहे. किंबहुना सत्यशोधक समाजाला अभिप्रेत असलेल्या आदर्श माणसाचे चित्रण यात येते. पुढे १९०३ मध्ये धनुर्धारी यांची 'पिराजी पाटील' ही कांदबरी प्रकाशित झाली. 'बळीबा पाटील' ही रुपकात्मक कांदबरी असल्याने असेल त्या कादंबरीला फारसे यश मिळाले नाही. पण 'पिराजी पाटील' ही मराठीतील पहिली यशस्वी कादंबरी म्हणून ओळखली जाते. ग्रामीण जीवन, शेती आणि शेतकरी, दुष्काळामुळे शेतकऱ्यांची होत असलेली उपासमार यात आली आहे. हरिभाउ आपटे यांची 'काळ तर मोठा कठीण आला' ही कथा १८९८ च्या सुमारासच प्रसिद्ध झाली. १८९७ साली महाराष्ट्रात पडलेल्या दुष्काळावर शासकीय पाहणी अहवालानुसार सुचली असावी असे म्हटले जाते. या दोन्ही साहित्यकृती ग्रामीण जीवन रेखाटण्याच्या हेतूने निर्माण झालेल्या नसाव्यात तर अस्वस्थ करणाऱ्या जीवनाला मांडावे हा सहानुभूतीचा भाग असावा असे दिसते. खेड्यात राहणाऱ्या लोकांच्या काही समस्या असू शकतात त्यांचे जगणे, त्यांचे जीवनानुभव साहित्याचा विषय होऊ शकतात याचे भान त्या काळातील लेखकांना फारसे असावे असे वाटत नाही. कारण महात्मा फुले



यांची सत्यशोधक समाजाची चळवळ सोडली तर ग्रामीण भागात सर्वसामान्य माणसांच्या समस्या समजून घेणारे आणि त्या सोडविण्यासाठी प्रयत्न करणारे समाजसुधारक तिकडे नव्हते. जे होते ते पांढरपेशा वर्गातील आणि उच्चवर्णीय असणारे शहरातच होते.

१९२० नंतर मात्र हे चित्र बदलले. १९२० नंतर महात्मा गांधी यांच्या हातात देशाची सूत्रे आली. गांधीजींच्या नेतृत्वाचा प्रभाव महाराष्ट्रावरही पडला.भारत हा खेड्यांचा देश आहे. भारतातील बहुतांश लोक हे खेड्यात राहतात. बहुतांश लोक शेती शेतकरी यांच्यावर अवलंबून असतात. शेतीतील उत्पन्नावरच शहरातील लोक जगतात हे त्यांनी जाणले. ग्रामजीवनाच्या मध्यवर्ती असलेला शेतकरी आणि कष्टकरी सुधारला पाहिजे या हेतूने समाजसुधारकांनी व राजकारण्यांनीही खेड्याकडे गेले पाहिजे, त्यांना समजून घेतले पाहिजे यासाठी त्यांनी 'खेड्याकडे चला' हा संदेश दिला.

एकोणिसाव्या शतकाच्या मध्यानंतर महात्मा फुले, महाराजा सयाजीराव गायकवाड, राजर्षी शाहू, कर्मवीर भाऊराव पाटील यांनी बहुजनांच्या उद्धारासाठी कार्य सुरु केले होते. मात्र त्याला खरी गती गांधीजीच्या नेतृत्वानंतर आली.१९२० नंतर गांधीवाद, समाजवाद, ब्राह्मणेतर चळवळ, मार्क्सवाद यामुळे ग्रामजीवनावरील साहित्यनिर्मिती होऊ लागली आणि १९२५ नंतर खऱ्या अर्थाने ग्रामीण साहित्य प्रवाहाला चालना मिळण्यास सुरुवात झाली.१९२५ च्या दरम्यान रविकिरण मंडळातील गिरीश, यशवंत यांनी जानपदगीते वा ग्रामगीते लिहिली. ग.ल.ठोकळ यांचा 'सुगी' हा प्रातिनिधिक कवितासंग्रह १९३३ मध्ये ग.ह.पाटील यांचा 'रानजाई' १९३४ मध्ये प्रसिद्ध झाला. यापूर्वीही भा.रा.तांबे यांचे 'गुराख्याचे गाणे', चंद्रशेखर यांचे 'काय हो चमत्कार' हे खंडकाव्य प्रसिद्ध झाले होते. पुढे १९४१ मध्ये के नारखेडे यांचा 'शिवार' हा काव्यसंग्रह प्रसिद्ध झाला. ना.घ.देशपांडे यांचा 'शीळ', अनंत काणेकर यांचा 'कोळ्याचे गाणे', सोपानदेव चौधरी यांचा 'पाह्यलं गं दारी' हे काव्यसंग्रह आले. १९५२ मध्ये 'बहिणाबाईची गाणी' वाचकांसमोर आली. ग्रामजीवनाचे एक वेगळे दालन वाचकांना खुले झाले.

स्वातंत्र्योत्तर काळातील ग्रामीण कवितेत आनंद यादव यांच्या १९६० साली प्रसिद्ध झालेल्या 'हिरवे जग' या काव्यसंग्रहाने भर घातली. ग्रामजीवनातील



Dr. Babasaheb ... Mahavidyalaya

कष्ट, दुःख, नात्यांमधील परस्परसंबंध समाजजीवन असा व्यापक पट घेऊन कविता आकाराला येऊ लागली. राजा महाजन 'डहाळी' (१९६०), सरोजिनी बाबर 'पाळणा' (१९६४), सदाशिव माळी 'फुलमाळ' (१९६७), ना.धो.महानोर 'रानातल्या कविता' (१९६७), पुरुषोत्तम पाटील 'तळ्यातल्या सावल्या' (१९७८), एकनाथ देशमुख 'ओळखी-अनोळखी' (१९७२) यासारखे काव्यसंग्रह प्रकाशित झाले. विठ्ठल वाघ, शंकर बडे, मधुकर पांढरे, उत्तम कोळगावकर, नारायण कुलकर्णी कवठेकर, राजन गवस, मोहन पाटील, श्रीरंग विष्णू जोशी, सुधाकर गायधनी, माधव थोरात, टी.एन. परदेशी, ह. शि. खरात, इंद्रजित भालेराव, चंद्रकुमार नलगे, महेश केळूसकर, अविनाश पाटील अशा कितीतरी कवींनी ग्रामजीवनाचे दाहक वास्तव रेखाटले आहे.

ग्रामीण आणि प्रादेशिक असे काही विचारप्रवाह पुढे आले. मात्र अखेरी ग्रामीण आणि प्रादेशिक यात आशयाच्या दृष्टीने फारसा भेद करणे उचित नाही असे वाटते. धनुर्धारी, भालेकर यांच्यानंतर प्र. ह.खाडिलकर 'स्वाधीन संसार' (१९२७), भा.वि.वरेरकर 'सात लाखातील एक'(१९३०), रा.शा.पाटील 'सीता' (१९३१), ग.रा.वाळींबे 'मोहित्यांची मंजुळा (१९३१), वि.वा.हडप 'अन्नदाता उपाशी' (१९३७), र.वा.दिघे 'पाणकळा'१९३९, 'सराई' (१९४३), ग.ल.ठोकळ 'गावगुंड', वि.वा.शिरवाडकर 'वैष्णव' (१९४५), बा.सी.मर्ढेकर 'पाणी' (१९४८), व्यंकटेश माडगुळकर 'बनगरवाडी' (१९५५) अण्णा भाऊ साठे 'फकिरा' (१९५९), उद्धव शेळके 'धग' (१९६०) द.ता.भोसले 'मी आणि माझा बाप' (१९७०), शंकर पाटील 'टारफुला' (१९६४), हमीद दलवाई 'इंधन' (१९६५), रा.र.बोराडे 'पाचोळा'(१९७१), आनंद यादव 'गोतावळा' (१९७१), ना.धो.महानोर 'गांधारी' (१९७३), रघुनाथ पाटील, 'मातीत मिळाले मोती' (१९७३), चंद्रकुमार नलगे 'आगीन फूल' (१९७४), बाबा भांड 'जरंगा' (१९७८), व. बा. बोधे 'कातण' (१९७९), राजन गवस 'चौंडक' (१९८५), आनंद यादव 'झोंबी' (१९८७), 'नांगरणी' (१९९०), राजन गवस 'कळप' (१९९१), 'धिंगाणा' (१९९२), नागनाथ कोत्तापल्ले 'उलट चालिला प्रवाहो', 'गांधारीचे डोळे' (१९८५), आनंद पाटील 'कागूद आणि सावली '(१९८६), मोहन पाटील 'लिगाड' 'खांदेपालट' (१९८९), विश्वास पाटील 'पांगिरा' (१९८९), रवींद्र शोभणे 'कोंडी' (१९९२), बाबाराव



मुसळे, 'हाल्या हाल्या दूदू दे' (१९९५) या आणि यासारख्या कितीतरी कादंबरीकारांनी मराठी ग्रामीण साहित्याचे दालन समृद्ध केले.

मराठी ग्रामीण कथेचा विचार करता हरिभाऊ आपटे यांच्या 'काळ तर मोठा कठीण आला' नंतर श्री. म.माटे यांच्या 'उपेक्षितांचे अंतरंग' या कथासंग्रहाने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. त्यांनतर व्यंकटेश माडगूळकर, म.भा.भोसले, शंकर पाटील, द.मा.मिरासदार, उद्धव शेळके, मधू मंगेश कर्णिक, रा.रं.बोराडे, आनंद यादव, महादेव मोरे, चारुता सागर, सखा कलाल, रंगराव बापू पाटील, द.ता.भोसले, भास्कर चंदनशिव, आनंद पाटील, शंकर खंडू पाटील, द.स.काकडे, वासुदेव मुलाटे, बा.ग.केसकर, गणेश आवटे, प्रतिमा इंगोले यासारख्या कथालेखकांनी ग्रामजीवनातील वास्तव अधोरेखित केले आहे.

मराठीतील ग्रामीण नाटकांचा वेध घेताना पाहिले ग्रामीण नाटक म्हणून महात्मा फुले यांच्या 'तृतीय रत्न'या नाटकाचा उल्लेख करता येईल. पुढे रांगणेकर 'वहिनी'(१९४५), र.वा.दिघे 'माझा सबूद'(१९४८), परळ रंगभूमीचे अध्वर्यू मानले जाणारे ला.कृ.आयरे ची 'फिर्याद (१९४८),जुलूम (१९४९), 'कुलकलंक'(१९५१),'बुद्धिभेद'(१९५१), शेतकरीदादा (१९५१), मायमाउली (१९५३), ही नाटके, मु.गो.शिवलकर 'मायेचं मोल (१९५१),'पोटचा गोळा'(१९५३), कृ.गो.सूर्यवंशी 'न मळलेली वाट' (१९५१), भा.वि.वरेरकर 'जीवाशिवाची भेट'(१९५०), म.भा.भोसले' रक्ताचं नातं (१९५१), 'पतीचा खून'(१९५३),'लाडकी लेक'(१९५९), दिनकर द.पाटील'दसरा उजाडला'(१९५९), ग.ल.ठोकळ 'कशासाठी पोटासाठी'(१९६०),व्यंकटेश माडगूळकर 'तु वेडा कुंभार'(१९६१), 'नामा सातपुते (१९७८), मधु मंगेश कर्णिक 'देवकी'(१९६८), चंद्रकांत शेटये 'आली जवानीला जाग'(१९७२),'अंगार'(१९७५), रा.रं.बोराडे 'आमदार सौभाग्यवती', सुंदर तळाशीकर 'चाकरमनी'(१९८४), हरिभाऊ तवळे 'निवडणुकीचे तुफान'(१९८५), बी.के.पाटील 'सामना'(१९८९), मधुकर कांबळे 'सडा शिंपला रक्ताचा'(१९९०), चुडाराम वल्हारपुरे 'डाव तिमिराचा'(१९९२) इत्यादी या काही प्रातिनिधिक नाटकांचा आवर्जुन उल्लेख करावा लागेल. एकूणच मराठी ग्रामीण नाटकांचे आशयविश्व मांडताना डॉ.दीपक चव्हाण म्हणतात. ''या नाटकात सांस्कृतिक जीवनापेक्षा सामाजिक परिस्थितीचे

Dr. Babasaheb

वास्तववादी दर्शन कर्जबाजारी शेतकरी, चाकरमानी, रंगेल पुढारी, बाई, बाटली, तमाशा, ईर्षा, सूड, प्रेमप्रकरण, अंधश्रध्दा, नव्या सुधारणा, संकुचित वृत्ती, कलाकारांचे राहणीमान इत्यादी समस्या आशय, विषय सातत्याने आले आहेत.''[४] कालप्रवाहाबरोबर नाट्यतंत्राच्या बाबतीतही नाटक उत्तमपणे आकाराला येत असल्याचे प्रत्ययाला येते.

### समारोप

एकूणच मराठी ग्रामीण साहित्याचा विचार करता मराठी ग्रामीण साहित्य चौफेर विकसित होताना दिसत आहे. इंग्रजांच्या आगमनापूर्वी इथले काही प्रश्न घेऊन अवतरत असलेले साहित्य स्वानुभवातून समग्र समाजाला कवेत घेताना दिसत आहे. पारतंत्र्यात असताना स्वातंत्र्यप्राप्तीसाठी लढणाऱ्या पिढ्या तयार झाल्या. समस्या जाणून घेणारे आणि मांडणारे शहरांपुरतेच काम करीत होते. महात्मा फुले यांच्या 'सत्यशोधक समाज' चळवळीतील कार्यकर्ते सोडले तर इतरांना या देशाची साठ ते सत्तर टक्के जनता ग्रामीण भागात राहते आहे याचे भान नव्हते. लोकमान्य टिळकांच्या निधनानंतर महात्मा गांधीजीच्या हाती सूत्रे आली. त्यांनी जाणिवपूर्वक वास्तव जाणून खेड्यांचा विकास हा देशाचा विकास आहे हे लक्षात आणून दिले. 'खेड्याकडे चला' चा संदेश त्या दृष्टीने महत्त्वपूर्ण पाऊल ठरले.

समाजकारण, राजकारण, खेड्यापर्यंत पोहोचले, स्वातंत्र्यही मिळाले पण ग्रामजीवनात फारसे स्थित्यंतर घडताना दिसत नाही. दुष्काळाच्या खाईत लोटलेल्या बहुतांशी महाराष्ट्रापर्यंत पाणी पोहोचलेले नाही. शेतीचे तुकडे-तुकडे होत जात आहेत. कुटुंबव्यवस्था अधिकाधिक विभक्तेकडे चालली आहे. सर्वांना अन्नधान्य पुरविणारे शेतकरी आत्महत्या करीत आहेत. कधी जातीय तेढी निर्माण होत आहेत. कुटुंबातील प्रश्न वाढत आहेत. ग्रामजीवनातील धनदांडग्यांचे प्रस्थ वाढत आहे. समाजविकासासाठी आलेल्या योजनांमधील भ्रष्टाचार डोके वर काढत आहे. पर्यायाने नोकरीच्या शोधात बेकार तरुण स्वप्ने उराशी बाळगून शहरांकडे धाव घेत आहे. कौशल्याअभावी झोपडपट्ट्यांमध्ये राहून दिवस कंठत आहे. शिकलेला मुलगा पैसे कमावून आणील याची वाट पहात गावाकडील लोक दिवस काढत आहेत.अनेक



अंधश्रद्धा बोकाळत आहेत. रुढी-परंपरा, देवदेवस्की, नवस सायास, सण-उत्सव यात विज्ञानाची क्रांती होऊनही फारसे बदल होताना दिसत नाही. स्त्रियांचे शोषण येते त्यावरील पर्यायाचा विचार फारसा डोकावताना दिसत नाहीत.

प्रातिनिधिक स्वरुपातील या काही गोष्टी नोंदविलेल्या आहेत या आणि यासारख्या अनेक गोष्टींना ग्रामीण साहित्य कथा, कादंबरी, नाटक, कविता, ललितलेखन या साहित्यप्रकारांमधून जीवनाचा व्यापक पट मांडत आहे. एकूणच ग्रामीण साहित्याचा प्रवाह मराठी साहित्यप्रवाहाला समद्ध करणारा ठरत आहे.

### संदर्भ :


१. विश्वकोष, खंड ५, पृ.३५४.
२. अत्रे त्रिं.ना.,'गावगाडा', पृ.१ व २.
३. कोत्तापल्ले नागनाथ,'ग्रामीण साहित्य :स्वरुप आणि शोध' मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे,१९८५, पृ. ८२.
४. नंदपुरे ईश्वर, संपादक आणि इतर,'साहित्य, ग्रामीण आणि दलित' (डॉ. मदन कुलकर्णी गौरवग्रंथ), विजय प्रकाशन, नागपूर,२००२, पृ.१५६.


Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya



# साहित्यातून समाजदर्शन

संपादक

**डॉ. पांडुरंग भोसले**

सहसंपादक

**डॉ. राजेंद्र खंदारे**

**प्रा. वसंत गावडे**

**प्रा. व्यंकट सूर्यवंशी**

Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya
Aundh, Pune-67.

Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya Aundh, Pune-67.

# साहित्यातून समाजदर्शन

संपादक : डॉ. पांडुरंग भोसले

डॉ. राजेंद्र खंदारे, प्रा. वसंत गावडे, प्रा. व्यंकट सूर्यवंशी

**Sahityatun Samajdarshan**

Dr. Pandurang Bhosale, Dr. Rajendra Khandare,
Prof. Vasant Gawade, Prof. Vyankat Suryavanshi

प्रकाशक व मुद्रक
डॉ. उमा काळे-माळी
मारुती माळी
ज्ञानसूर्य प्रकाशन,
सर्व्हे नं. २१५, गंगानगर, पोस्ट फुरसुंगी,
ता. हवेली, जि. पुणे - ४१२ ३०८
भ्रमणध्वनी : ९७६५९०४१०३ /
९८८१२१५३६५
Email : umakaleswati@gmail.com
dnyansuryapublication@gmail.com

© डॉ. पांडुरंग भोसले, ९४२३२५५०३८

आवृत्ती पहिली :
१ जानेवारी २०१८

ISBN-978-81-926144-9-6
प्रकाशन क्रमांक : १९

मुखपृष्ठ :
राजश्री जाधव, पुणे

अक्षरजुळणी :
सिद्धी ग्राफिक्स, पुणे

मुद्रण :
श्री गणेश मुद्रणालय, पुणे

किंमत : रु. २००

Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya * Aundh, Pune-67. *

# अनुक्रमणिका

| | | |
|---|---|---|
| १) | कवी अनिल यांच्या सामाजिक कविता : प्राचार्य डॉ. शोभा इंगवले | ०७ |
| २) | स्त्री लेखिकांचे मराठी साहित्यातील योगदान : डॉ. गुंफा कोकाटे | १३ |
| ३) | साहित्य आणि समाज : डॉ. राजेंद्र खंदारे | १८ |
| ४) | बदलत्या कृषी जीवनाचे वास्तव: सिझर कर म्हणजेच माती : डॉ. देविदास गेजगे | २१ |
| ५) | १९९० नंतरच्या आदिवासी कवितेतील समाजदर्शन : डॉ. हनुमंत भवारी | २६ |
| ६) | नारायण सुर्वे यांची सामाजिक कविता : डॉ. पांडुरंग भोसले | ३२ |
| ७) | आधुनिक मराठी आत्मचरित्रातील सामाजिक व सांस्कृतिक दर्शन : डॉ. उमा काळे-माळी | ३६ |
| ८) | लोकनेते शाहीद पुंडलिक फरांदे यांच्या शाहिरीतील सामाजिकता : डॉ. संग्राम थोरात | ४१ |
| ९) | ह. मो. मराठे यांच्या कादंबऱ्यांमधील पुरुषाचे समाजातील स्थान व महत्त्व : डॉ. पौर्णिमा कोल्हे | ४६ |
| १०) | समाजजीवनाच्या वैचारिक जागृती व अभिव्यक्तीसाठीच रूपकात्मक नाटके : डॉ. नानासाहेब पवार | ५० |
| ११) | साहित्य आणि चळवळ : डॉ. प्रभाकर पवार | ५५ |
| १२) | व्यक्ती, साहित्य आणि समाज यांच्यातील पर्यावरणीय अनुबंध : नव्या दिशा : डॉ. प्रविण ससाणे | ६५ |
| १३) | 'राहुकेतू'मधील समाजजीवन : डॉ. सोमनाथ दडस | ६८ |
| १४) | आदिवासी कादंबरीतील समाजदर्शन : प्रा. सच्चिदानंद खडके | ७५ |
| १५) | साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त मराठी कादंबऱ्यांमधील समाजजीवन : प्रा. वसंत गावडे | ७९ |
| १६) | बंजारा लोकसाहित्यामधील समाजदर्शन : प्रा. तुकाराम चव्हाण | ९० |
| १७) | ग्रामीण कथेचा समाजशास्त्रीय अनुबंध : प्रा. नाना झगडे | ९५ |

तात.

सा
ाय

Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya Aundh, Pune-67.

# नारायण सुर्वे यांची सामाजिक कविता

डॉ. पाडुरंग भोसले

'एकटाच आलो नाही युगाचीही साथ आहे; सावध असा तुफानाची हीच सुरुवात आहे; कामगार आहे मी तळपती तलवार आहे; सारस्वतानो थोडासा मी गुन्हा करणार आहे.' असे म्हणत मार्क्सवादाला हाताशी धरून मराठी कवितेला स्वप्नरंजनातून वास्तवादी बनविण्याचे काम नारायण सुर्वेंनी केले.

नारायण सुर्वे ज्या कामगार वस्तीमध्ये वाढले त्या कामगार वस्तीतूनच त्यांची जडण-घडण झाली. कार्यकर्ता, विचारवंत, कवी आणि त्यांचा सर्जनशील आत्मा याच बकाल समजल्या गेलेल्या कामगार वस्तीमध्येच उभा राहिला. अशा या कामगार जगताविषयी ते म्हणतात, दुःखाने ती गांगरत, परंतु क्षणात स्वतःला सावरत. श्रम विकणारी ही दुनिया असल्यामुळे एकोपा निर्माण होई. इथली माणसे लढ्याला भीत नाहीत. प्रखरपणे प्रतिकार करणे हा इथला धर्म होता. प्रतिकार हा इथला मानदंड आहे. विशेष म्हणजे या वस्त्या जागरूक आणि निर्मितीक्षम आहेत. त्यांनीच लिहिलेल्या काव्यपंक्तीतून ते लिहितात, इथले शौर्य वर्णाया मजपाशी शब्दखाणी नाहीत बाप्पा ! असे ते म्हणतात. जीवनवादी कवी, लोकाभिमुख कवी अशा विविध बिरुदावल्या त्यांना लावल्या जातात हे त्यांच्या कवितेचे वेगळेपण होय. त्यांनी लोकमानसाच्या भाषेचा अधिकाधिक उपयोग केलेला आहे. ते कवितेचे वेगळेपण सांगताना म्हणतात, माझी कविता केवळ माणसासाठीच आहे. लढून समाज बदलणाऱ्यासाठी आहे. याचाच अर्थ माणसावर प्रचंड विश्वास ठेवणारी त्यांची कविता आहे असे म्हणता येईल.

नारायण सुर्वे हे स्वतः कामगार असल्याने 'जसा जगत आहे मी तसा शब्दात आहे' असे मोठ्या अभिमानाने म्हणू शकले. नारायण सुर्वे हे साम्यवादी असल्याने त्यांच्या कवितेत ही जाणीव शोधावी लागत नाही. 'ऐसा गा मी ब्रह्म'मधील बहुसंख्य कविता ह्या ह्याच जाणिवेनी व्यापली आहे. आपण सूर्यकुलातील आहोत ही त्यांना कायम जाणीव असते. मी आणि आम्ही यामध्ये फारसा फरक सुर्वे उरू देत नाहीत. सुर्वेंनी अंधपणाने या जाणिवा स्वीकारल्या नाहीत. शोषितांच्या जीवनावर प्रभाव गाजविणाऱ्या विचारांचे उगमस्थान, एक मुक्तीस्थान म्हणून मार्क्सचा विचार नारायण सुर्वे करताना दिसतात. त्याचबरोबर मार्क्सच्या गटेप्रेमाचा उल्लेख करून आर्थिक

विचारापलीकडे असलेल्या मार्क्सचा सौंदर्यासक्तीचा ते वेध घेतात. मार्क्सवादी जाणीव सुर्व्यांच्या विचारांना आणि अवलोकनाला दारुण भूतकाळ आणि विषम प्राप्तकाल यांचे संपूर्ण निर्दालन करण्यासाठी चाललेला संघर्ष आणि भविष्याची पाहिलेली स्वप्ने या त्रिमितीत बद्ध करते. साम्यवादी विचारधारा स्वीकारली की अशा आशयव्यूहाला सामोरे जाण्यावाचून गत्यंतरच नसते. पण हा आशयव्यूह ते कसा स्वीकारतात, कसा राबवतात आणि त्यापलीकडे ते डोकावून पाहू शकतात की नाही, आपले कलास्वातंत्र्य अबाधित राखून स्वप्न आणि वास्तवाच्या मर्यादा ते ओळखतात की नाही हे शोधणे महत्त्वाचे ठरते.

**माणुसकीची कळ जपणारी कविता :**

''नारायण सुर्वे यांनी आपल्या खडतर जीवनातील वेदनेचा वेद करुन त्यांनी श्रेष्ठ काव्याची गुढी उभारली. सुर्वे यांची कविता आत्मनिवेदनी आहे. त्याच्या जीवनाच्या संगतीने वाढलेली कविता आहे. कामगारांचे जीवन मुंबईत सुर्वे यांनी प्रत्यक्ष अनुभवले आहे. त्याच जीवनाचे अत्यंत वास्तव आणि जिवंत चित्र ते रेखाटतात. आयुष्य जगणे हीच मोठी समस्या होऊन बसली आहे, अशा या विपरित स्थितीत आपल्या जिद्दी मनोवृत्तीची, लढाऊ वृत्तीची, नव्या युगाच्या क्रांतीची स्वप्ने पाहणारी, अत्यंत प्रामाणिक, भावोत्कट आत्मलक्षी कविता सुर्वे यांनी लिहिली.''[१]

कष्टकरी-श्रमिकांच्या विश्वातील अनुभव, त्यांच्याच जीवनातील प्रतिमांमधून व्यक्त करणारी त्यांची कविता, एकूण मराठी काव्यविश्वात आपल्या वेगळेपणाने उठून दिसते. सुर्वे यांची कविता लढाऊ वृत्तीने, कणखर मनाने, समाजक्रांतीची जोपासना करणारी आहे. अनुभवाशी सतत इमान राखून, नव्या जगाची स्वप्ने, मुंबईकर कामगारांच्या बोलीभाषेत सुर्वे सांगतात. कणखर आशावाद ही त्यांच्या शैलीची खास वैशिष्ट्ये आहेत. नारायण सुर्वे यांच्या कवितेबद्दल डॉ. एस. एस. भोसले म्हणतात, ''झंझावातातही पदराखाली पणती सांभाळून चालण्यात सुर्वे यांच्या कवितेला आनंद आहे.''[२] परिणामतः नारायण सुर्वे यांची कविता खास करून त्यांची आहे. मात्र ती सुर्वे या व्यक्तीची नसून सुर्वे यांच्या रूपात सामावलेल्या समाजमनाची प्रतिनिधीरुप कविता आहे. सुर्वे आयुष्यातील नव्या जुन्या अनुभवाला सामोरे जाऊन जगले. रुख्यासुख्या वृत्तीने न चालता, जीवनाचे हाडाचे प्रेमिक म्हणून चालत राहिले. जीवनाला तिढा देऊन, त्यावर स्वार झाले आणि त्यामधील आर्त स्पंदनांची बिनचूक नोंद करीत गेले.

सुर्वे यांनी मराठी कवितेला प्रखर वास्तवाची नवी दीक्षा दिली. कामगार आणि दलित-पीडित यांच्या जीवनाचा प्रत्यक्ष अनुभव घेतल्याने त्यांच्या कवितेत सामाजिक क्रांतीचा उद्घोष आढळतो. वृत्तीने ते जसे झुंजार आहेत, तसेच मानवी जीवनावरील अपार श्रद्धेमुळे ते आशावादीही आहेत. दलित-पीडित व कामगारांचे जीवन, त्यांच्याच प्रतिमांतून व भाषेतून ते निर्भयपणे व्यक्त करीत असल्यामुळे, त्यांची कविता वेगळी वाटते आणि ती उठून दिसते. सुर्वे यांनी मराठी

Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya, Aundh, Pune-67



कवितेत क्रांतीयुगाची सुरुवात केली आहे असे त्यांच्या कवितेविषयी म्हणता येते.

केशवसुत, मर्ढेकर यांच्यानंतर मराठी कवितेला स्वतंत्र वळण देण्याचे काम सुर्वे यांच्या कवितेने केले आहे. वैयक्तिक सुखदुःखाचा परिस्फोट त्यांच्या आरंभीच्या कवितांतून झालेला दिसत असला, तरी पुढे त्यांची कविता अधिकाधिक समाजसन्मुख झालेली आहे. कामगार, दलित, झोपडपट्टीत राहणारे लोक यांच्या जीवनातील बऱ्या-वाईट गोष्टींची अनुभूती कवीने प्रत्यक्ष घेतलेली असल्यामुळे त्यांची कविता अत्यंत जिवंत रसरशीत बनलेली आहे.

कविवर्य कुसुमाग्रज 'ऐसा गा मी ब्रह्म' या काव्यसंग्रहाच्या प्रस्तावनेत म्हणतात, नारायण सुर्वे हे कामगार जीवनाशी केवळ समरस झालेले नव्हते तर ते जीवन प्रत्यक्षात अनुभविणारे कवी आहेत. सभोतालच्या परिसरात काही श्रद्धा जागत्या ठेऊन ते जगत आहेत आणि त्यातून त्यांनी आपल्या काव्याचा शोध घेतलेला आहे. त्यांची बरीचशी कविता लढाऊ वृत्तीची, समाजक्रांतीची उपासना करणारी, नव्या आनंदवनभुवनाचे स्वप्न पाहणारी आहे. प्रामाणिकपणा आणि उत्कटता ही त्यांच्या सत्काव्याची आधारतत्त्वे होत. सुर्वे यांच्याजवळ या दोन्ही गोष्टी होत्या.

डॉ. ललिता कुंभोजकर म्हणतात, मराठी कवितेत मर्ढेकरांच्या नंतर एक महत्त्वाचे पर्व उलगडते ते नारायण सुर्वे यांच्या कवितेचे होय. नारायण सुर्वे यांच्या कवितेकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. मराठी नवकाव्यामध्ये बा.सी. मर्ढेकरांनी मानवी जीवनाचे भकास रूप, यंत्रयुगामुळे आलेली त्रुटीतता, खंडीतता, विज्ञान युगातील मनुष्याचे क्षुद्र अस्तित्व आणि भयान एकाकीपण यांचे दर्शन आपल्या कवितेतून प्रथम घडविले आहे. मात्र नारायण सुर्वे यांनी त्यापुढे जाऊन मराठी कवितेमध्ये ज्या स्वतःच्या दुनियेचे दर्शन घडविले ते दर्शन रोखठोख, अस्सल आणि प्रामाणिक होते. नारायण सुर्वे यांच्या पूर्वसुरींनी तसे दर्शन घडविले नव्हते. मर्ढेकरांनी जे दर्शन घडविले ते रोकड्या स्वरूपाचे असले तरी ते त्याहीपुढे जाणारी कविता सुर्वेंनी लिहिली. माणसाच्या जीवनात असलेली दारिद्र्याची, भाकरीची आग प्रचंड होती आणि या आगीच्या धगधगत्या वास्तवातून या कवीचे जीवन बाहेर आलेले होते. या जीवनामध्ये असलेला संघर्ष, अन्याय, विषमता, पिळवणूक यांमुळे हादरलेले कवीचे मन त्यांच्या कवितेतून बोलके होत गेले आहे. अनेक व्यथांचे चित्रण हा सुर्वे यांच्या कवितांचा विषय आहे. पण अपूर्व हे की, व्यथांचे चित्रण असूनही त्यांची कविता कुठेही नैराश्यपूर्ण, दुबळी किंवा अगतिक झालेली दिसत नाही. पराभवाच्या कसोटीचे अनेक क्षण जीवनात आले पण त्यातून बाहेर पडण्याची उमेद त्या क्षणाला जिंकण्याची जिद्द आणि जीवनाचा घेतलेला रोखठोख अनुभव आपल्याला त्यांच्या कवितेत जाणवतो.

नारायण सुर्वेंनी कविता लिहिली ती जीवनाच्या विद्यापीठामध्ये जी माणसे त्यांना अनुभवाला आली आणि त्यांच्या मनाच्या शाळेत घर करुन राहिली तीच माणसे त्यांना कविता लिहिण्यास प्रवृत्त करताना दिसतात असे म्हणता येईल. जीवनाच्या विशाल वाटेवर भेटलेली

Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya
Aundh, Pune-67.

माणसे व त्यांचे ऐकलेले नि स्वतः अनुभवलेले जीवन म्हणजे त्यांचे विद्यापीठच होय. या जीवनाच्या विद्यापीठात सुर्वेना अनेक रंगांची, अनेक चेहरे असलेली, भाकरीसाठी करपलेली, कोळपलेली अनेक जीवने पाहिली आणि आपल्या कवितेतून व्यक्त केली. एकूणच नारायण सुर्वेची कविता ही माणुसकीची कळ जपणारी आहे असे म्हणता येईल. जगणे व्यक्त करणारी कविता एका नव्या तुफानाची, नव्या युगाची जाणीव करुन देणारी आहे. कवीने व्यक्त केलेली वेदना केवळ त्यांची एकट्याची नाही तर जागतिक स्वरुपाचे रुप धारण करणारी आहे. ते एका कवितेत म्हणतात, ''एकटाच आलो नाही, युगाचीही साथ आहे, सावध असा तुफानाची, हीच खरी सुरुवात आहे.'' माझे विद्यापीठच्या प्रस्तावनेत कुसुमाग्रज म्हणतात, सुर्वे यांचे काव्य कामगार जीवनातून आले आहे, याचे महत्त्व मला एवढ्यासाठी वाटते की, अनुभवाच्या एका वेगळ्या प्रांताचे नितळ दर्शन वाचक म्हणून मला या काव्यामध्ये होते. या संदर्भात दोन गोष्टी जाणवतात. ही कविता कवीच्या जीवनाशी अनुभवांशी आणि श्रद्धेसी प्रामाणिकपणे बांधलेली आहे.... तिला स्वभावतः एक प्रतिज्ञा आहे. कमिटमेंट आहे. दुसरी गोष्ट अशी की, हे सर्व करण्याची तिच्यामध्ये कुवत आहे, म्हणजे ती प्रत्ययकारी आहे.

मध्यम वर्गाच्या पलीकडे, हादरवून टाकणारे जग, प्रथमच चित्रित केले. अनुभवाला सरळ सामोरे जाण्याची त्यांची रीतही विलक्षण जिवंत स्वरूपाची आणि त्या अनुभवातील अस्सलपणा व्यक्त करणारी आहे. अनेकदा भावनोत्कट क्षणीसुद्धा ती स्वतः भावविवश होत नाही. या कवितेचा केंद्रबिंदू माणूस आहे. हा माणूस देशातला, मातीतला, अगदी तळागाळाचा आहे. या सामान्य माणसाच्या पिळवटल्या जाणाऱ्या, शोषल्या जाणाऱ्याच्या वेदनेची ही कहाणी आहे. क्रांती, कामगार, यंत्र असे शब्द यात असले तरी माणूस हा तिचा संदर्भ महत्त्वाचा आहे.

नारायण सुर्वे यांची कविता अशी मानवी जीवनातील सत्य शोधणारी आहे. जीवनाच्या विद्यापीठात कष्टाची लिपी शिकून, मनाची उभारी आणि जगण्याची जिद्द टिकविणारी आहे. नव्या युगाचा जाहिरनामा मुक्तकंठाने गर्जणारी आहे. सामान्यातील सामान्य माणसाच्या हाती हक्काने जगण्याची सनद देणारी आहे. तसेच मानव्याचे भान ठेवावयास आवाहन करणारी आहे.

**संदर्भः**

१. पाध्ये दिगंबर, (आधुनिक मराठी कवितेचे तिसरे वळण) प्रस्तावना नारायण सुर्वे यांच्या समग्र कविता, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, पृ. ३५

२. काळे अक्षयकुमार डॉ., अर्वाचीन मराठी काव्यदर्शन, पां.ना. बनहट्टी प्रकाशन, नागपूर, १९९९, पृ.६११

# Dr.Subhash Aher

## Marathi

Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya * Aundh, Pune-67. *

# निमित्त :
# स्वप्नांच्या पडझडीनंतर...




संपादक : डॉ. यशवंत राऊत

• **Nimitt :** Swapnanchya Padzadinantar
• **Editor :** Dr. Yashwant Raut

• **निमित्त** : स्वप्नांच्या पडझडीनंतर...

• प्रकाशक
नडकट्टी प्रकाशन
सौ. प्रेमा नडकट्टी, ट्रेनिंग कॉलेज रोड
के. शी. पार्कजवळ, धारवाड ५८० ००८
भ्रमण : ० ९० ३५ १२ ३१ ८६

• मुद्रक
अंजीश प्रिंटर्स
१५०४/६-७, 'यशोरंग,'
फोर्ड कॉर्नर, लक्ष्मीपुरी, कोल्हापूर.
फोन : २६४२३१५

• प्रथमावृत्ती : फेब्रुवारी २०१८

© सर्व हक्क सुरक्षित

• संपादक
डॉ. यशवंत राऊत
ए-५, क्वार्टर्स, पावटेनगर
कर्नाटक विद्यापीठ, धारवाड
भ्रमण : ० ९५ ९१ १७ ५० ११

• मुखपृष्ठ संकल्पना
'अंजीश,' कोल्हापूर

• मूल्य रु. १५०/-

• ISBN No. : 978-93-85154-03-

• कवी चंद्रकांत पोतदार • 94232 86479 •

# निमित्त :
## स्वप्नांच्या पडझडीनंतर...

★Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya ★ Aundh, Pune-67.

## अनुक्रम


भूमिका ● डॉ. यशवंत शंकर राऊत / ६

काळाची अस्वस्थता मांडणारी कविता ● डॉ. द. ता भोसले / ९

वर्तमान वास्तवाची संवेदनशील कविता ● डॉ. अच्युत माने / १४

जगण्याच्या संदर्भातील अंतर्मुखतेचे भाष्य ● प्राचार्य डॉ. प्रकाश कुंभार / १७

'पडझडी'नंतरचा प्रवास सुफळ-संपूर्ण हवा ● प्राचार्य डॉ. सुनीलकुमार लवटे / १९

तिठ्यावर उभा असलेला कवी ● प्रा. डॉ. विश्वनाथ शिंदे /२२

पापणीखाली ओल सांभाळणारी कविता ● प्रा. डॉ. केशव देशमुख / २७

पडझडीनंतरही स्वप्नांना शब्दरूप देणारी आश्वासकता ● प्राचार्य डॉ. सयाजीराजे मोकाशी / ३०

हरवलेल्या मूल्यांचा कोलाहल ● प्रा. डॉ. चं. वि.जोशी / ३४

विदारक वास्तवाला भिडणारी कविता ● प्रा. डॉ. दत्ता पाटील/ ४१

दुःखजाणिवेचे व्यापक प्रतिमाविश्व ● प्रा. डॉ. सुजय पाटील / ६०

आतड्याचा पीळ सोडवू पाहणारी कविता ● डॉ. शशिकांत चौधरी / ६४

वर्तमानाचा ताळेबंद ● अरुण इंगवले / ६९

माणुसकीचा ठाव घेणारी कविता ● डॉ. राजेंद्र अत्रे / ७३

पडझडीच्या काळातही लय जपणारा कवी ● नीलेश शेळके / ७७

स्वप्नमोळीचे बांधकाम ● प्रा. डॉ. रमेश साळुंखे / ८३

अस्वस्थ प्रश्नांचा गुंता ● प्रा. डॉ. माधव भोसले / ८८

अगतिक जीवनाचा लेखाजोखा ● प्रा. डॉ. श्यामसुंदर मिरजकर / ९६

अनुभवाचा तळ शोधणारी कविता ● अंजली कुलकर्णी / ९९

मातीशी इमान राखणाऱ्या कविता ● प्राचार्य डॉ. जी. पी. माळी / १०३

हरवल्या हुरहुरींची उत्कटता ● डॉ. कैलास दौंड / १०६

वर्तमानातलं अस्वस्थ जगणं ● प्रा. डॉ. विनोद कांबळे/ १०९

जीवनाबद्दलचे गंभीर भाष्य ● संजय बोरुडे / ११२

चिंतनगर्भ कवितांचे जग ● प्रा. डॉ. पांडुरंग भोसले / ११५

अस्वस्थ करणारी अस्वस्थ कविता ● डॉ. श्रीराम पचिंद्रे / ११९

जागतिकीकरणात हरवल्या गावाची पायवाट शोधणारी कविता ● डॉ. सुनील जवंजाळ / १२५

'स्वप्नांच्या पडझडीनंतर...'मधील भावांदोलने ● प्रा. डॉ. गिरीश मोरे / १२९

स्वप्नांच्या पडझडीनंतरही ! ● डॉ. अ. रा. यार्दी / १३५

माय, माणसं आणि मातीच्या शोधाची कविता ● प्रा. अरुण शिंदे / १३९


Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya, Aundh, Pune-67

कवी प्राध्यापक असल्याने शिक्षणाच्या व्यवस्थेबद्दलही जागरूक आहे. शाळा व शिक्षण त्याच्या नजरेतून सुटणे कठीणच. घरच्या पत्राच्या निमित्ताने कवी त्यावर भाष्य करतो.

वह्या-पुस्तकांच्या ओझ्याखाली
शिकण्याच्या निमित्तानं
मरणाऱ्या पोरांच्या शाळा सुरू झाल्यात.

'आत किलबिल होते', 'आई : काही संदर्भ' इ. कवितांत आईविषयीच्या कृतज्ञतेचा भाव प्रकट झाला आहे. 'फडाचा संसार'मध्ये गीताच्या परिमाणामध्ये बांधलेल्या गेय कवितेत ऊसतोड मजुराची व्यथा प्रकर्षाने टिपली आहे.

असा फडाचा संसार उसापाल्यात चालतो
बाप अनवाणी पायाची अशी चाळण सोसतो

कवीने ग्रेसवर पीएच. डी. केलेली आहे. त्यामुळे संशोधनाच्या निमित्ताने जो ग्रेस त्यांना भावला, त्याविषयीची 'पोएटिक पोएट्री' म्हणता येईल अशी 'ग्रेस' नावाची कविता या संग्रहात आहे. ग्रेसने वापरलेल्या छंदातही काही स्वरचित कविता कवीने या संग्रहात दिल्या आहेत.

'जन्म नसतो स्वतःच्या परवानगीचा मोफत पास' या शब्दांत कवी जीवनाबद्दलचे गंभीर भाष्य व्यक्त करतो आणि केव्हाही युद्ध सुरू होईल या चिंतेत आपली कविता प्रसवतो. या युद्धखोर मानवी प्रवृत्तीमुळेच एकूण माणसाचे जगणे धोक्यात आले आहे; त्यामुळे प्रत्येक नवोन्मेषाच्याच्या स्वप्नांची पडझड अटळ आहे. 'आपण काय व किती मिळवत आहोत' याहीपेक्षा आपण काय हरवत चाललो आहोत, याचा विचार कवी चंद्रकांत पोतदार करतात. या ब्लर्बच्या ओळींतून प्रसिद्ध कवी खलील मोमीन यांनी चंद्रकांत पोतदारांच्या कवितेचे मर्म पकडले आहे आणि ते रास्तच आहे.

'साहित्याचा प्रभाव त्याच्या सामर्थ्यात असतो आणि हे सामर्थ्य म्हणजे साहित्यकृतीच्या अंतरंगातील नैतिक मूल्ये; पण येथे हे लक्षात ठेवणे अत्यावश्यक असते की, प्रत्येक साहित्यकृतीची नवी स्वतंत्र नीती असते. सामाजिक प्रगती व अधोगतीची जाण ठेवून नवी मूल्ये सांगण्याचा अधिकार तिला असतो.' या के. रं. शिरवाडकर यांच्या म्हणण्याप्रमाणे चंद्रकांत पोतदार यांच्या कवितेची स्वतंत्र नीती अभ्यासण्यासाठी संशोधकांनी आपापल्या परीने प्रयत्न करावेत. जागतिकीकरणानंतरच्या २०-२५ वर्षांच्या काळात आलेला हा संग्रह असून तो आक्रस्ताळी स्वरूपाचा नाही, तर संवेदनशीलतेला फुंकर घालून ती जागी करण्याचा प्रयत्न करणारा, अल्पाक्षरी बंधाचा नेटका संग्रह आहे.

**– संजय बोरुडे**

२१ अ, अमन, एकता कॉलनी, गोविंदपुरा, अहमदनगर - ४१४०१



Dr. Babasaheb ... Mahavidyalaya, Aundh, Pune-67.

# चिंतनगर्भ कवितांचे जग

**– पांडुरंग भोसले**

'स्वप्नांच्या पडझडीनंतर...' हा चंद्रकांत पोतदार यांचा कवितासंग्रह वाचनात आला आणि बऱ्याच दिवसांतून काहीतरी चांगले वाचल्याचे मनस्वी समाधान लाभले. या समाधान लाभण्यातही एक प्रकारची अस्वस्थता होती. डोळ्यांच्या कडा ओलावत हे सर्व समजून घेत गेलो.

माणूस, त्याच्या भावभावना, कल्पना, विचार, कुटुंब, नाती, त्याची स्वप्ने, स्वप्नांचा होत जाणारा चुराडा, गावाची ओढ; पण गावाला गावपण न राहिल्याची खंत, जन्मापासून मृत्यूपर्यंत सतत करावा लागणारा संघर्ष आणि त्यातून वाट्याला येत असलेले दुःख, बदलत जाणारी नाती, त्या नात्यांचा शोध, आयुष्याचा अर्थ शोधू पाहणारी आर्त जाणीव... या आणि यांसारख्या कितीतरी गोष्टी मनाला अंतर्मुख करीत गेल्या. त्याचा हा लेखाजोखा.

या कवितासंग्रहातील कवितांचा विचार करता, सर्वसाधारणपणे आई, आयुष्य, नाती, दुःख, स्वप्नं, माणसं, गाव अशी आशयदृष्ट्या विभागणी करता येईल.

आत किलबिल होते, हा पीळ आतड्याचाही, आई : काही संदर्भ, भारा उन्हाचा डोईचा, आई, मरणकळांची झूल या कवितांतून आईची विविध रूपे आलेली आहेत. आयुष्यभर घरासाठी घाम गाळणारी आई, तिच्या जाण्याने होणारी मनातील कालवाकालव, तिच्या दाटून आलेल्या स्मृती, तिची दुःख सहन करण्याची, तिच्या आशीर्वादावर जगण्याचे बळ मिळत असले तरी ओलावणाऱ्या पापण्यांवर अडखळणाऱ्या पाण्याचं काय करू? हा आर्त प्रश्न अंतःकरणाला भिडतो. एवढेच काय, स्वतःच्या आजारपणावर मात करीत मुलावर जिवापाड प्रेम करणाऱ्या आईची आठवण आणि –

आता माझ्या सुखवस्तू घरात
आईला कुठून आणू?

पोरकेपणातून मुलापुढे उभा राहिलेला प्रश्न अंतःकरण हेलावून टाकणारा आहे.

मानवी जीवनच मुळी अत्यंत गुंतागुंतीचे आणि व्यामिश्र स्वरूपाचे आहे. त्याचा शोध घेण्यातच मानवाच्या कित्येक पिढ्या काळाच्या पडद्याआड जात आहेत; पण 'आयुष्य' कसे वाट्याला येते

त्याचा शोध घेणे थांबत नाही. कवी येथे आयुष्याचे विविध पदर उलगडण्याचा नव्हे, शोध घेण्याचा आणि त्यांना शब्दांकित करण्याचा प्रयत्न करीत आहेत असे दिसते. इतकं का सोपं असतं? स्वतःमधून स्वतःलाच, मातीची आण, आयुष्य उतरत्यावेळी, गर्भाळला असा ऋतू, दूर आभाळी घरात, चैतन्याचे संदर्भ, लाख सोने व्हावे, सर्वत्र व्यापून..., माणसांच्या अभयारण्यातला, काळजाचे कढ उतू..., कुठवर नेतंय हे जगणं, आभाळ पांगळे झाले, पावलं, मातीची मुळंच बोलू पाहतायंत!, पाखरं, आजमितीचे संदर्भ या काही कवितांचा आवर्जून उल्लेख करता येईल.

मानवी जीवनात कोलमडून पडावे असे कितीतरी प्रसंग येतात. अशा वेळी त्या ढासळलेपणातून स्वतःलाच सावरावे लागते, हे भान व्यक्त होते. माणसाचे जन्माला येणे त्याच्या हातात नाही तसे मरणही त्याच्या हातात नाही, हे वास्तवही त्याला सतत खुणावत राहते. असे असले तरी माणूस आशेवर, स्वप्नांवर जगणारा प्राणी आहे. स्वप्नांचा चुराडा झाला तरी एक स्वप्न भंगले की दुसरे स्वप्न उराशी बाळगून जगण्याची माणसाची रीत आहे. हा भावही त्यांची कविता अधोरेखित करते. इतरांशी जीवघेणी स्पर्धा करीत जगण्याचा उन्माद दाखविणारा माणूस आयुष्यभर धडपडत राहतो; पण त्याचे जाणे अटळ असते. त्याच्या जाण्यानेही कोणावर फारसा परिणाम होत नाही. सोपस्कार संपले की, सर्वजण आपल्या कामात मग्न होतील. त्याचे अस्तित्व मात्र 'माणसांच्या अभयारण्यातला, तो एक पाळीव प्राणी!' एवढेच राहील. यातून माणसांच्या मनातील इतरेजणांविषयीचा कोरडेपणा आणि बेगडीपणाच पुढे येतो.

दुःखावर प्रेम करणारा हा कवी आहे असे मला वाटते. दुःख हे अटळ आहे; पण ते दुःख जगासमोर मांडताना आक्रोश नाही, आगपाखड नाही. माणसाच्या आयुष्यातील दुःखाचे विविध पापुद्रे अलगद उलगडत नेण्याचा त्यांचा ध्यास असल्याची प्रचिती त्यांची कविता देते. एवढेच काय, 'पावलं'मधून जन्माला येणाऱ्या बाळाच्या भवितव्याची चिंताही ते व्यक्त करतात. मानवी जीवनातील सवंग दुःखाचा पसारा मांडीत ग्रामजीवनातील मातीत राबणाऱ्या हातांचेही दुःख ते मांडतात आणि अखेरीस माणसाच्या आयुष्यात दुःख अटळ असले तरी एक प्रकारचा आत्मविश्वास कविमन ढळू देताना दिसत नाही. म्हणूनच ते म्हणतात,

आकाशाला गवसणी घालताना<br>कोसळताच येत नाही धुवांधार.

आयुष्य, आयुष्यातील चढउतार, कोलमडण्याची स्थिती तरी उभारी हे जीवनवास्तव मांडत असताना त्याचीच दुसरी बाजू 'दुःख.' ते समजून घेताना शब्दाशब्दांत दिसून येतात. झाड बाळगते मौन, मातीची आण, कसे विसरावे बाई, आत किलबिल होते, हा पीळ आतड्याचाही, भल्या भल्या प्रार्थनेत, किती काळ सोसू, पंखाला टोचून तीर, जगताना खोलवर, पापण्यांच्या पंखांखाली, हृदयाचे पेव, मौनात उडाले पक्षी, जगण्याच्या घुसमटीत गुदमरतोय श्वास, दुःख तुझे अनवानी याची साक्ष या कविता देतात.



मानवी जीवनातील दुःख कधी निसर्गावर आरोपित होऊन येते. 'झाड बाळगते मौन' या कवितेतून त्याची प्रचिती येते. स्त्रीजीवनातील दुःख कवीला अधिक अंतर्मुख करते. दारिद्र्यावर मात करीत जगताना होणारी उलघाल 'कसे विसरावे बाई' या कवितेत येते. कधी दुःखाचे कढ अनावर होताना वाट्याला येणारी असाहाय्यता प्रकट होते. कधी प्रेमातील विरहाचे दुःख व्यक्त होते. अबोल प्रीतीतील घुसमट त्यातून व्यक्त होते, तर वाट्याला आलेल्या अतीव दुःखाने गलितगात्र झालेले असतानाही मातीवरील दृढ विश्वास संपत नसल्याचा भाव अभिव्यक्त होतो. या सर्वच गोष्टी लक्षात घेता मानवी जीवनातील दुःखाचे विविध स्तर कधी तटस्थपणे तर कधी आत्मतत्परतेतून आलेले दिसतात.

कवीच्या चिंतनाचा आणखी एक पैलू पुढे येतो आणि तो म्हणजे 'गाव.' पूर्वी गावात असलेला एकोपा, नात्यांमधील जिव्हाळा कमी होत असल्याची खंतही काही कवितांतून येते. इथला उजेडही, कुणी दिली मूठमाती, उजेडाचा गाव, कुंपण, मातीचा आधार, भिजत नाही पापणीही, फडाचा संसार, दूरस्थ किनाऱ्यावरचा, वर्तमान श्वासांच्या तपशिलात... यासारख्या कवितांचा त्यात उल्लेख करता येईल. स्वतःच्या नात्यासारखा एकमेकांशी जिव्हाळा जपणारा गाव आता राहिला नसल्याची खंत ते व्यक्त करतात. असे असले तरी गावची आणि मातीची ओढ कवीला सातत्याने साद घालताना दिसून येते. आपले दुःख व्यक्त करताना ते म्हणतात,

ओळख असूनही<br>फारशी भिजत नाही<br>पापणीही आता कुणाचीच,<br>खरंच का पापण्यांचा लिलाव झालाय?

Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya Aundh, Pune-67.

असे असले तरीही गावाकडची माणसे इतरांना तगवत जगत राहतात, याचे भान कवी देतो. एकूणच काय गाव, गावातील माणसे, त्यांचे हेवेदावे हे वास्तव असले तरी ती गावातच राहत असतात, हे वास्तव कवी मांडून जातो.

कवीच्या चिंतनाचा आणखी एक विषय आहे व तो म्हणजे 'नाती.' या नात्यांचा शोध स्वतःमधून स्वतःलाच, कुणी दिली मूठमाती, हा पीळ आतड्याचाही, काळजांच्या नात्यांचाच, नाळ, नाती आणि माती, वारसदार, वाट पांभर रानाची या कवितांमधून त्यांनी घेतला आहे.

जवळच्या नात्यांकडून मिळणारी दुःखं माणसाला अधिक अस्वस्थ करतात. तसाच तग धरत जगण्याची धडपड मात्र सुरू असते. आपल्याच नात्याला आपलीच नाती अशी मूठमाती का देतात? हा प्रश्न कवीला सतत सतावताना दिसतो. नात्यांच्या दुःखांनी आतड्याला पीळ पडत असला तरी गावाची आणि नात्यांची ओढ संपत नाही, संपू नये हीच मनोधारणा कवी 'हा पीळ आतड्यांचाही' या कवितेत मांडतात. ते लिहितात,

ही ओल पापण्यांमधली
वेढते घोर जिवाला
मन धुंडत धुंडत जाते
सैरभैर उंबरठ्याला

नात्यांवरील निष्ठाच यातून व्यक्त होते. असे असले तरी 'नाळ, नाती आणि माती'मधून मात्र कौटुंबिक नात्यातील दुभंगलेपणातून आलेली एक प्रकारची उद्विग्नता ते मांडतात. त्याबरोबरच एकत्र कुटुंब पद्धतीला विभक्त कुटुंब पद्धतीचे लागलेले ग्रहणही मन सुन्न केल्याशिवाय राहत नाही.

रक्ताच्या नात्यातील बंध तुटतानाचे दुःख तर आहेच; पण एकूणच 'माणूस' आणि माणसाचे माणूसपणही त्यांना साद घालताना दिसते. माणसं, बिनविषारी माणूस हवाय, जन्म नसतो स्वतःच्या... यांसारख्या कवितांतून ते माणसाचा शोध घेतात. 'माणूस समाजशील प्राणी आहे' अशी व्याख्या केली जाते; पण आजच्या या स्पर्धेच्या, धकाधकीच्या, जागतिकीकरणाच्या युगात माणूस एकमेकांपासून कोसो दूर चालला आहे; पण असे का होते आहे? हा प्रश्न कवीला अस्वस्थ करतो आणि म्हणूनच ते मला 'बिनविषारी माणूस हवाय' अशी आर्त हाक देताना दिसतात.

मन हेलावून टाकणाऱ्या वास्तवाला सामोरे जाताना कवीची घुसमट, कोंडमारा होताना दिसतो, तरीही स्वप्ने त्यांची पाठराखण करताना दिसतात. स्वप्न उशाशी बांधून, बेमालूम झालीत स्वप्नं, स्वप्नांच्या पडझडीनंतर... या कवितांमधून ते स्वप्नांचा शोध घेतात. कालचा आणि आजचा माणूस माणूसच आहे; पण स्वार्थ, मोह, आपलेपणाला लागलेले ग्रहण, माणुसकीचा पडत चाललेला विसर याच गोष्टी माणसाला दूर नेत आहेत, हे भीषण वास्तव कवी पदोपदी मांडताना आढळतो. मोबाईल, बाप, पत्र, मरण, व्यक्ती, भूक यांसारखे विषयही त्यांच्या आस्थेचे आहेत.

एकूणच या कवितासंग्रहाचा आढावा लक्षात घेता माणूस, विविध नाती, त्यांचे दुभंगलेपण, गावाचे पालटलेले रूप, आंतरिक जिव्हाळ्याला लागलेले ग्रहण, माणसाचे तुटलेपण, जागतिकीकरणामुळे उभे ठाकलेले प्रश्न आणि या सगळ्यांत हरवत चाललेला माणूस पोतदारांच्या चिंतनाचा आणि चिंतेचा विषय आहे. या सर्वांमधून ते वास्तव अधोरेखित करीत असल्याची जाणीव सतत होते. स्वप्नांच्या पडझडीनंतरही माणूस हा माणूस म्हणून उभा राहिला पाहिजे, ही त्यांची जीवननिष्ठा आहे. या कवितांमधील चिंतनगर्भतेचा विचार करता ग्रेस यांच्या कवितेची आठवण होते आणि म्हणूनच कवी ग्रेस यांच्या कवितेचा वारसदार म्हणून चंद्रकांत पोतदार अधिक लक्षात राहतील, असा विश्वास वाटतो.

**– प्रा. डॉ.पांडुरंग भोसले**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर कॉलेज, औंध, पुणे

Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya Aundh, Pune-67

* * *



# अस्वस्थ करणारी अस्वस्थ कविता

**– श्रीराम पचिंद्रे**

